# जिल्हा स्त्री रुग्णालय, अकोला.

## शौचालय कंत्राटाबाबत अटी व शर्ती (सन २०२०-२०२१)

## (दुसरी वेळ)

जिल्हा स्त्री रुग्णालय, अकोला परिसरातील उपलब्ध शौचालय साफसफाई व देखभालसाठी नोंदणीकृत संस्थांकडुन दि. १४/०८/२०२० ते १३/०८/२०२१ या कालावधीत कंत्राटाकरीता खालील अटी व शर्ती नुसार निविदा मागविण्यात येत आहे.

दरपत्रके दि. ०६/०८/२० ते १२/०८/२० या कालावधीत (सुटटीचे दिवस वगळुन) सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करावे.

अटी व शर्तीः-

१) शौचालय साफसफाई व देखभालीचा कंत्राट हा कार्यादेश प्राप्त झाल्यापासून. ते (एक वर्षाकरीता) पर्यंत अंमलात राहील.

२) शौचालय प्रसाधन गृहामध्ये कोणत्याही प्रकारची फेरफार व बदल न करता येणार नाही.

३) शौचालयाचा वापर करणा-या प्रत्येक व्यक्तीकडुन प्रत्येकी रु.५/- प्रमाणे आकारण्यात यावा.रु.५ पेक्षा जास्त शुल्क आकारल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ कंत्राट रद्द करण्यात येईल.

४) प्रसाधन गृहाअंतर्गत टयुबलाईट, बल्ब बदलण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील व त्याकरीता रुग्णालयाकडून पुरवठा केल्या जाणार नाही.

५) कंत्राटदाराने प्रसाधन गृहाकरीता पर्यवेक्षक कर्मचारी व सफाई कर्मचारी यांची नेमणुक करावयाची आहे. त्यांची नावानिशी यादी एका बोर्डवर रंगवून शौचालयाचे दर्शनी भागात लावणे आवश्यक राहील.

६) रुग्णालयीन सफाईकामगार अथवा पर्यवेक्षक करारानंतर शौचालयाच्या कामामध्ये कार्यरत राहणार नाही.

७) कंत्राटदाराने निर्धारीत कामे सामाधानकारक केली नसल्यास एक महिन्याच्या नोटीसव्दारे करार रद्द करण्याचा अधिकार वैद्यकिय अधिक्षिका,जिल्हा स्त्री रुग्णालय,अकोला यांना राहील.

८) प्रसाधन गृहामध्ये वापरावयाची साबण,सोडा,फिनाईल,ॲसिड,खराटे, क्लीनिंग ब्रश व इतर साहित्य संबधित कंत्राटदारास स्वखर्चाने करावे लागेल.

९) शौचालया व आसपासचा परिसर २४ तास स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१०) शौचालयाची देखभाल व्यवस्थीत होते कींवा नाही याची खातरजमा करण्यांचा अधिकार प्रशासकीय अधिकारी, जिल्हा स्त्री रुग्णालय,अकोला यांना राहील. वेळोवेळी दिल्या गेलेल्या सुचनांचे पालन करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

११) शौचालयाच्या भिंतीवर किंवा अवतीभोवती शौचालय संबंधी फलका व्यतिरीक्त इतर कोणताही फलक अथवा जाहीरात लावण्याबाबत सक्त मनाई

राहील.पुरुष स्त्री शौचालयाकरीता स्वंतंत्र गेटकिपर ठेवावा. प्राधान्याने स्त्री शौचालयाकरीता स्त्री गेटकिपर ठेवावा.

१२) शौचालय वापरणारे रुग्ण नातेवाईक अथवा इतरांना शौचालयामध्ये न कळत काही दुखापत झाल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

१३) शौचालयाच्या कामी कंत्राटदार तर्फे नेमणुक करण्यात येणारी सफाई कामगार तथा इतर कर्मचारी यांचे वेतन व इतर देवाण घेवाण बाबतची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील तसेच कामावर बालकामगार ठेवता येणार नाही.

१४) शौचालयामध्ये विजपुरवठा वापरण्याकरीता दरमहा रु.५००/- (रुपये पाचशे फक्त) वेगळे भरावे लागेल.

१५) प्रसाधन गृहाचे वापर करणा-या व्यक्ती रु. ५/-शुल्क असले तरी १२ वर्षाच्या खालील मुला/मुलींकरीता शुल्क घेता येणार नाही.

१६) शौचालयातील कंत्राटदाराकडे कर्मचा-यांना विशिष्ट गणवेशातच व ओळखपत्र ठेवून काम करावे लागेल हा गणवेश कंत्राटदारास स्वंतःपुरवावा लागेल.

१७) निविदेत नमुद करण्यात आलेल्या दरापेक्षा जास्त शुल्क आकारल्यास प्रति वैद्य तक्रार रुपये ५००/- (रुपये पाचशे फक्त) दंड आकारण्यात येईल.व आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम २४ तासाच्या आत या कार्यालयास भरणे बंधनकारक राहील.

१८) वैद्यकीय अधिक्षिका जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला हे सदर कंत्राटाचा करार करतील व कराराचे अंमबलजावणीवर अतिरीक्त जिल्हा शल्य चिकीत्सक / प्रशासकीय अधिकारी / कार्यालयीन अधिक्षक / भांडारपाल यांचे लक्ष राहील.

१९) संस्थेसोबत सदर करानाम्यात दिलेल्या कालमर्यादे पर्यंत ग्राहय राहील करारातील अटी व शर्ती यांचे पुनर्विलोकन दर ६ महिन्याने करण्यात येईल. आवश्यकतेनुसार वेळोवेळी सुधारणा करावयाच्या सुचना दिल्या जातील ते कंत्राटदारास बंधनकारक राहील.

२०) प्रसाधन गृहातील स्वच्छतेबाबत रुग्ण व नातेवाईक तसेच शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांची तक्रार राहणार नाही याची दक्षता घेवून दैनंदिन देखभाल कंत्राटदारालाच करावी लागेल.

२१) कंत्राटदार शौचालयाचा भुभाग व त्यावरील संडास बाथरुम इतर कोणासही भाडयाने देवू शकणार नाही.

२२) कंत्राट मंजुर झाल्यानंतर त्यासंबधीचा करार संबंधीतांना करुन दयावा लागेल कंत्राट करारातील लागणारा मुद्रांक शुल्क रु.१००/- (स्टॉम्प) व नोंदणी शुल्क (डयुटी रजिस्ट्रेशन) इत्यादी खर्च कंत्राटदारास करावा लागेल.

२३) रुग्णालयातील पाईप लाईन वरुन पाण्याच्या वापराकरीता दरमहा रु.५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) शुल्क भरावे लागतील.

२४) रुग्णांच्या नातेवाईकांना शौचालयाच्या व्यतिरीक्त आंघोळीची व्यवस्था राहणार नाही.

२५) मान्य करण्यात आलेली दराची रक्कम कंत्राटदाराला शौचालयाचा ताबा घेण्यापुर्वी एक रक्कमी रक्कम रोख स्वरुपात या कार्यालयात भरणाकरुन रितसर पावती घ्यावी लागेल. नंतरच शौचालयाचा ताबा देण्यात येईल.

२६) ज्या संस्थाधारकास शौचालयाच्या कंत्राटाबाबत निविदा भरवयाची असल्यास संस्थाधारकावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा नसणे आवश्यक आहे.तसेच शौचालयावर काम करणा-या कर्मचा-यावर सुध्दा गुन्हा दाखल नसावा.

२७) जे संस्थाधारक निविदा सादर करणार आहेत त्यांचेकडे ओळखपत्र असणे तसेच निविदा उघडतांना प्रतिनिधींना उपस्थित ठेवावयाचे असल्यास त्यांचेकडे संस्थेचे प्राधिकारपत्र असणे आवश्यक राहील.

२८) शौचालयाची निविदा भरणा-या संस्थाधारकास रु.२५०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) अनामत रक्कम भरावी लागेल. तसेच शौचालयामध्ये काही नुकसान झाल्यास किंवा तक्रारी प्राप्त झाल्यास त्याबाबतची नुकसान भरपाईची रक्कम कपात करण्यात येईल व उर्वरित रक्कम कंत्राट संपुष्टात आल्यनंतर परत करण्यात येईल.

२९) जे संस्थाधारक शौचालयाच्या निविदा भरणार आहेत. त्यांचेकडे संस्थेच नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

३०) निविदा सादर करतांना लिफाफा क्र.१ मध्ये संस्थेचे पॅन क्रमाकची छायांकीत प्रत / संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्र छायांकित प्रत /मागील वर्षाची बॅंक स्टेटमेंटची छायांकीत प्रत सादर करावी व लिफाफावर क्रं.१ हे नमुद करणे आवश्यक आहे.तसेच लिफाफा सिलबंद असणे आवश्यक आहे.व लिफापयावर शौचालय सेवा कंत्राट बाबत निविदा असे नमुद करणे आवश्यक राहील.

३१) निविदा सादर करतांना लिफाफा क्र.२ मध्ये कंत्राटाचे (वार्षिक) दर सादर करावे लागेल व लिफाफयावर क्रं.२ हे नमुद करणे आवश्यक आहे.व लिफापयावर शौचालय कंत्राट असे नमुद करणे आवश्यक राहील. तसेच लिफाफा सिलबंद असणे आवश्यक आहे.

३२) लिफाफा क्रं.१ व २ सादर करतांना दोन्ही लिफाफे सिलबंद असणे आवश्यक आहे.

३३) मेहतर समाजाच्या नोदणीकृत सहकारी संस्था / एजन्सी (कम्पनी)/ धर्मदाय रजि.संस्था याना प्रथम प्राधान्याने देण्यात येईल परंतु निविदेमध्ये कंत्राटाची रक्कम जी जास्त असेल तेवढी रक्कम भरणे बंधनकारक राहील.

वरीलप्रमाणे सर्व अटी व शर्ती मान्य असणे आवश्यक आहे.

निविदा दि. १३/ ०८ /२०२० रोजी दुपारी १ वाजता वाजता निविदा समिती व निविदाधारक समक्ष उघडण्यात येतील. निविदाधारक उपस्थित नसल्यास निविदा समिती समक्ष निविदा उघडण्यात येतील.

(डॉ.आरती एल.कुलवाल)

वैद्यकीय अधिक्षिका
जिल्हा स्त्री रुग्णालय,अकोला.